RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ४६] सोमवार, एप्रिल ६, २०२६/चैत्र १६, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५६**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ६ एप्रिल २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३.**

क्रमांक रामआ-२०२६/प्र. क्र. ३५ (ई-१६१२२४८)/का-१०.—ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ (१९९३ चा १५) च्या कलम ३ मधील उप-कलम (१) आणि उप-कलम (२) मधील खंड (अ) आणि कलम ४ मधील पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून शासन अधिसूचना, महिला व बाल विकास विभाग क्र. रामआ-२०२४/प्र. क्र. ९१/का-१०, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ अन्वये श्रीमती रुपाली निलेश चाकणकर यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, श्रीमती रुपाली निलेश चाकणकर यांनी त्यांच्या दिनांक २० मार्च २०२६ च्या पत्रान्वये अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महिला आयोग या पदाचा राजीनामा दिलेला असून त्यांचा राजीनामा शासनाने मंजूर केलेला आहे.

आता त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ (१९९३ चा १५) च्या कलम-४ मधील उप-कलम (२) व त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करून शासनाने यान्वये श्रीमती रुपाली निलेश चाकणकर यांचा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावरील राजीनामा मंजूर केला असल्याचे अधिसूचित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. रा. ठाकूर,**
शासनाचे सह सचिव.

**WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT**

New Administrative Building, Third Floor, Madam Cama Road,
Hutatma Rajguru Chowk, Manatralaya, Mumbai 400 032,
dated the 6th April 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN ACT, 1993.

No. RMA-2026/C. R. 35 (E-1612248)/Desk-10.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Women and Child Development Department, No. RMA-2024/C.R. 91/ Desk-10, dated the 15th October 2024, issued in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (a) of sub-section (*2*) of section 3 and sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra State Commission for Women Act, 1993 (XV of 1993), nominated Smt. Rupali Nilesh Chakankar as a Chairperson of the Maharashtra State Commission for Women, for a period of three years ;

And Whereas, Smt. Rupali Nilesh Chakankar has *vide* her letter dated the 20th March 2026 resigned from the post of the Chairperson, Maharashtra State Commission for Women and her resignation has been accepted by the Government.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 4 of the Maharashtra State Commission for Women Act, 1993( XV of 1993) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby notifies that the Government has accepted the resignation of Smt. Rupali Nilesh Chakankar from the post of the Chairperson of the Maharashtra State Commission for Women.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. R. THAKUR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.